अपिल क्रमांक ०९/२०१९

## श्रीमती संगीता महादेव माळी

विरुध्द

## श्री. शरद शिक्षण प्रसारक मंडळ व इतर

**निशानी क्र. ५२ खालील आदेश**
**(दिनांक १५ जानेवारी २०२४)**

प्रस्तुतचा अर्ज प्रतिवादी क्रमांक १ व २ यांनी सादर करुन अपिलकार यांनी डी.एड. अभ्यासक्रम पूर्ण करीत असताना वर्ष पहिले व दुसरे यांचे गुणपत्रक व शाळा सोडल्याचा दाखला सादर करणेकरीता सादर केला आहे. अपिलकार यांनी निशानी क्रमांक ५३ वर म्हणणे देवून अर्जास विरोध दर्शविला.

२. प्रतिवादी क्र. १ व २ यांच्या कथनाप्रमाणे प्रस्तुतच्या अपिलाचा निकाल गुणदोषावर होण्यासाठी अपिलकार यांच्या डी.एड. अभ्यासक्रमाच्या पहिल्या व दुस-या वर्षाचे गुणपत्रक व शाळा सोडल्याचा दाखला महत्वपूर्ण कागदपत्र असून ते न्यायाधिकरणात दाखल करणे आवश्यक असल्याचे नमूद केले आहे.

३. याउलट अपिलकार यांच्या कथनाप्रमाणे प्रस्तुत कागदपत्रांचा अपिलाशी काही एक संबंध नाही. ते कागदपत्र महत्त्वाचे का आहेत याबाबतचा उहापोह प्रतिवादी यांनी केलेला नाही. या व्यतिरिक्त प्रस्ततचे कागदपत्र अपिलकार यांच्याकडे उपलब्ध नसल्याचे कथन अपिलकार यांनी केले आहे.

४. प्रस्तुत अपिलाचे अवलोकन केले असता असे निदर्शनास येते की, प्रतिवादी व्यवस्थापन हे ५ वी ते ७ वी चे वर्ग कायम विनाअुनदानित तत्वावर चालवित होते. त्या काळात पद रिक्त झालेने दिनांक १४-०६-२००४ रोजी अपिलकार यांची नियुक्ती सहा शिक्षिका म्हणून केलेली आहे. प्राथमिक शाळेवरील नियुक्ती करताना डी.एड. अभ्यासकम हा पात्रतेसाठी महत्त्वपूर्ण आहे. या परिस्थितीत अपिलकार या कथीत वेळेत डी.एड. होत्या किंवा कसे हे पाहणे गरजेचे ठरते. सबब शैक्षणिक अर्हता दाखविण्याची सर्वस्वी जबाबदारी अपिलकारावर आहे.

५. अपिलकार यांनी सदर कागदपत्र त्यांच्या ताब्यात नसल्याचे कथन केले आहे. मला येथे प्रकर्षाने नमूद करावेसे वाटते की, गुणपत्रक व शाळा सोडल्याचा दाखला हे महत्त्वपूर्ण कागदपत्र असून ते अपिलकार यांचे वैयक्तिक कागदपत्र आहेत व त्या सदर कागदपत्रांच्या कब्जेदार आहेत. अशा परिस्थितीत विद्यमान विधिज्ञ यांनी अपिलाकाराकडे कागद नाहीत असे सुचविणे संयुक्तिक दिसून येत नाही. अपिलकार यांचेकडे त्याचे वैयक्तिक कागदपत्र नाहीत अशा परिस्थितीत त्याबाबतचे शपथपत्र सादर करणे अपेक्षित होते व न्यायोचित ठरले असते. याउपरोक्ष निशानी ५३ वर सादर केल्या म्हणण्यावर अपिलकार यांची सही दिसून येत नाही. यापरिस्थितीत विद्यमान विधिज्ञ यांनी मांडलेला युक्तीवाद ग्राहय धरता योणार नाही.

६. सेवानिलंबनाच्या अपिलामध्ये शैक्षणिक पात्रता पाहणे गरजेचे असलेने मागणी करणेत आलेले कागदपत्र गुणदोषावर निकालाकरीता महत्त्वपूर्ण असलेने नाकारता येणार नाहीत. सबब खालील आदेश –

## आदेश

१. अर्ज मंजूर करणेत केला.
२. अपिलकार यांनी १५ दिवसांच्या आत कागदपत्र न्यायाधिकरणासमोर सादर करावेत.

सही/–
(वै. नि. ढवळे)
पीठासीन अधिकारी,
शाळा न्यायाधिकरण, कोल्हापूर.

तारीख – १५/०१/२०२३
ठिकाण – कोल्हापूर